# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०७/२०२४ (रविवार) दुपार**

---

### अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपींतांविरूद्ध स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक २७/०७/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उमरेड विभागातील पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय बातमीदारा कडून माहिती मिळाली की, उमरेड हद्दीतील नगरपरीषद उमरेड समोरील रोड येथे होंडा ॲक्टिवा क्र. MH 40 AJ 0051 ने अवैध दारूची वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या माहितीचे आधारे नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— १) विशाल / सोनू चंद्रशेखर शेंडे रा. उमरेड २) आयुष मिलिंद धनविजय रा. उमरेड** यांच्या ताब्यातून अवैधरीत्या विनापरवाना १) विदेशी दारू IMPERIAL BLUE चे ९६ नग किंमती १५३६०/—रू. २) विदेशी दारू ROYAL STAG चे ४० नग किंमती ७२००/—रू. ३) होंडा ॲक्टिवा क्र. MH 40 AJ 0051 किंमती ४०,०००/—रू. असा एकूण ६२५६०/— रू चा मुद्देमाल मिळुन आला. जप्त मुद्देमाल व आरोपी यांना पुढील कायदेशीर कामी पोलीस स्टेशन उमरेड चे ताब्यात देण्यात आले. पोस्टे उमरेड येथे आरोपींविरूद्ध कलम ६५अ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, HC अरविंद भगत, HC गजेंद्र चौधरी, HC मयूर ढेकले, PC राकेश तालेवर, DPC आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर